पोलीस शिपाई संवर्गातील सन २०२१ मधील रिक्त पदे १००% भरण्यासाठी पदभरती निर्बंधामधून सूट मिळण्याबाबत....

**महाराष्ट्र शासन**
**गृह विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः पोलीस-११२२/प्र.क.२२/पोल-५अ**
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक :- १४ ऑक्टोबर, २०२२

**वाचा :-**

१) वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक-पदनि-२०२२/प्र.क्र.२/२०२२/आ.पु.क., दि.१२.०४.२०२२
२) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य,मुंबई यांचे अ.शा.पत्र क्र. पोमसं/प्रशि/पोशि भरती-प्रक्रिया २०२१/१८८/२०२१/२८०५, दि.०७.०९.२०२२
३) पोलीस महासंचालक,प्रशिक्षण व खास पथके, महराष्ट्र राज्य,मुंबई यांचे पत्र क्र. प्रशि/पोशि भरती-प्रक्रिया २०२१/१८८/२०२१/१८८/२०२१/२९९४, दि.२६.०९.२०२२

**प्रस्तावना :-**

राज्याच्या पोलीस दलातील पोलीस शिपाई संवर्गातील सन २०२१ मध्ये पोलीस शिपाई, पोलीस शिपाई चालक व सशस्त्र पोलीस शिपाई संवर्गात सुमारे ११४४३ इतकी पदे भरतीसाठी उपलब्ध होणार आहेत.

दरम्यान वित्त विभाग, शासन निर्णय क्र.पदनि-२०२२/प्र.क्र.२/२०२२/ आ.पु.क., दि.१२/०४/२०२२ अन्वये पदभरतीच्या अनुषंगाने सूचना देण्यात आल्या असून यामध्ये सुधारीत आकृतीबंध अंतिम मंजूर केले आहेत, अशा सुधारित आकृतीबंधातील महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कक्षेतील पदे वगळता अन्य पदे ५० टक्के भरण्यास अनुमती देण्यात आली आहे.

सद्यस्थितीत कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीने पोलीस शिपाई संवर्गातील पदांची अत्यंत आवश्यकता असल्याने सदर संवर्गातील १०० % रिक्त पदे तातडीने भरणे आवश्यक आहे. त्यानुषंगाने संदर्भाधिन क्र. १ च्या शासन निर्णय, वित्त विभाग दि.१२/०४/२०२२ च्या तरतूदीमधून सूट मिळण्यासाठीच्या प्रस्तावास दि.२७/०९/२०२२ रोजीच्या बैठकीमध्ये मा.मंत्रिमंडळाने मान्यता दिली आहे. मा.मंत्रिमंडळाच्या दि.२७/०९/२०२२ रोजीच्या बैठकीतील निर्णयाच्या अनुषंगाने सन २०२१ मधील पोलीस शिपाई गट-क संवर्गातील रिक्त पदे भरण्याकरिता संदर्भ क्र.१ येथील वित्त विभाग, शासन निर्णय दि.१२/०४/२०२२ मधील तरतूदींमधून सूट देण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

**शासन निर्णयः-**

राज्याच्या पोलीस दलातील पोलीस शिपाई, गट-क या संवर्गातील सन २०२१ या वर्षात विविध कारणास्तव रिक्त झालेली पोलीस शिपाई/पोलीस शिपाई चालक/सशस्त्र पोलीस शिपाई या संवर्गातील एकूण ११४४३ पदे १०० % भरण्यास शासन निर्णय,वित्त विभाग क्र.पदनि-०२२/प्र.क्र.२/२०२२/ आ.पु.क., दि.१२/०४/२०२२ मधील तरतुदींमधून सूट देण्यात येत आहे.

२. प्रस्तुत प्रस्तावासाठी येणारा खर्च यासाठी मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा. तसेच याद्वारे

कोणतीही नवीन पद निर्मिती अपेक्षित नसून मंजूर पदांच्या मर्यादेत रिक्त पदे भरण्यात यावीत.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२२१०१४१२१३२५६०२९ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**(अनिल कुलकर्णी)**
**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२. पोलीस महासंचालक, अँटी करप्शन ब्युरो, महाराष्ट्र राज्य,मुंबई.
३. पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
४. अपर पोलीस महासंचालक, गुन्हा अन्वेषण विभाग (गुन्हे), महाराष्ट्र राज्य, पुणे.
५. आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
६. संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक.
७. प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण विद्यालय खंडाळा, जि.पुणे/ जालना/ अकोला/ नागपूर/ नानवीज दौंड/ मरोळ, मुंबई/ सोलापूर/ बाभळगाव, जि.लातूर
८. प्राचार्य, अपारंपारिक अभियान प्रशिक्षण केंद्र, नागपूर.
९. सर्व पोलीस आयुक्त.
१०. सर्व पोलीस अधीक्षक.
११. सर्व समादेशक, राज्य राखीव पोलीस बल
१२. महालेखापाल-१, (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परीक्षा) महाराष्ट्र, मुंबई
१३. महालेखापाल-२, (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परीक्षा) महाराष्ट्र, नागपूर
१४. अधिदान व लेखाधिकारी, मुंबई
१५. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
१६. निवासी लेखा अधिकारी, मुंबई
१७. वित्त विभाग (व्यय-७)/वित्तीय सुधारणा-१/आपुक
१८. निवडनस्ती (पोल-५अ).